# सहजीवन पत्रिका

## सर्व वाचकांना मराठी नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !!!



अंक क्र. ०४

१ एप्रिल २०२६

## अनुक्रमणिका


- संपादकीय
- सहजीवन प्रकल्प
- ज्येष्ठ नागरिक स्नेहमिलन
- प्रकल्पाच्या घडामोडी
- यशोगाथा
- ज्येष्ठांची शिल्पकार
- कविता
- पुढील वाटचाल





icmr INDIAN COUNCIL OF MEDICAL RESEARCH Serving the nation since 1911

आधारवड

सहजीवन ELITE












वार यंत्र












# संपादकीय

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. सामाजिक आंतरक्रियेमुळेच व्यक्ति आणि समूहात निश्चित स्वरूपाचे सामाजिक तसेच कौटुंबिक संबध निर्माण झालेले आहेत. समाज म्हणजे सामाजिक हितसंबध आणि नातेसंबधांच्या आधारे एकत्र राहत्या व्यक्तीचा समूह होय. आपले बरे वाईट बघणारा समाजच असतो. त्याच आधारावर कुटुंबव्यवस्था तयार झाली. यातही संयुक्त कुटुंब आणि विभक्त कुटुंब अशी विभागणी झाली. संयुक्त कुटुंबाची संकल्पना चांगली आहे. हे सगळ्यांना पटत असूनही त्यामध्ये मतभेद नसावेत असच वाटत. कारण कुटुंब म्हटलं तर घरात अनेक व्यक्ति राहतात दोन पिढीतील विचारांची तफावत असतेच.

एकमेकांविषयी आधार, प्रेम आणि जिव्हाळा असायला हवा. समजूतदारपणे आलेले प्रश्न सोडवायला हवे. थोरमोठ्यांचा मान राखायला हवा आणि दोन्ही पिढ्यांच्या विचाराचा आधार व्हायला हवा. तेव्हाच घरात खरे सुख नांदेल. कुटुंबातील नाती हे जीवनाचे आधारस्तंभ आहे ज्यात विविध नाती एकमेकांना जोडून ठेवतात. ही नाती प्रेम, विश्वास आणि आदराने बांधलेले असतात.

कुटुंबातील प्रत्येक नाते विशिष्ट भूमिका बजावतात. आजी आजोबा अनुभव शिकवतात. ही नाती संकटकाळी एकजूट करतात आणि आनंद दुप्पट करतात. नाती टिकवण्यासाठी वाद टाळून समजूतदारपणा ठेवावा. प्रेम आणि संवाद आवश्यक आहे. नात्यामधला मधाळ गोडवा जपणे. एकत्र क्षणात आनंद, चैतन्य वाढते. संकटकाळी भक्कम साथ देते. परस्पर समज आदराची शिकवण वडिलधाऱ्याचे अमुल्य आशीर्वाद हेच खरे वैभव.

असेच आदर्श कुटुंब घडविण्याचा प्रयत्न सहजीवन या प्रकल्पाद्वारे करण्यात येत आहे. घराघरात सु-संवाद राहावा ज्येष्ठ नागरिक ज्यांना राष्ट्रीय संपती समजल्या जाते. त्यांचा आदर व्हावा, त्यांच्या कौश्यल्याचा वापर व्हावा आणि त्यांच्या आहार- विहाराबाबत जागरूक राहून शारीरिक, मानसिक, आरोग्य चांगले राहावे याकरिता अनेक उपक्रम राबविले जाते.



**श्रीमती. ज्योती देवतारे**
**आधारवड,**
**ज्येष्ठ नागरिक परिवार, वर्धा**

# सहजीवन (ELITE) प्रकल्प



भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषद, नवी दिल्ली आणि महात्मा गांधी आयुर्विज्ञान संस्था, सेवाग्राम यांच्या संयुक्त विद्यमाने 'इलाईट' हा विशेष प्रकल्प ज्येष्ठ नागरिकांसाठी २०२४ पासून राबवण्यात येत आहे. या अगोदर "सहजीवन चैत्यन्य नात्याचे." प्रकल्प वर्ष २०२० ते २०२२ मध्ये वर्धा तालुक्यातील ५ प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या १८ गावांमध्ये सुरुवात करण्यात आली होती. ज्येष्ठ नागरिकांच्या सकारात्मक परिणामांमुळे त्याचा विस्तार करण्यात आला आणि आत "इलाईट' प्रकल्प वर्धा तालुक्यातील ५ प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या १०४ गावांमध्ये व २ नागरी भागांमध्ये सुरु आहे .

या प्रकल्पाची प्रमुख उद्दिष्टे ज्येष्ठ नागरिकांमध्ये आत्मनिर्भरता वाढवणे आणि पिढ्यांमधील दुरावा कमी करून परस्पर सुसंवाद व समज वाढवणे होय.

याशिवाय विविध गतिविधी, खेळ आणि चर्चांच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांच्या अडचणी व गरजा समजून घेतल्या जातात आणि त्या अडचणींवर उपाययोजना सुचवण्यासाठी त्यांच्याशीच चर्चा केली जाते. तसेच ज्येष्ठ नागरिकांकडे असलेले अनुभव, परंपरागत ज्ञान, कला आणि कौशल्यांचा उपयोग समाजाच्या समृद्धीसाठी केला जातो. त्यांच्या अनुभवांमधून प्रेरणा घेऊन तरुण पिढी अधिक परिपक्व निर्णय घेऊ शकते आणि सामाजिक समज वाढवू शकते. या अनुषंगाने गाव पातळीवर विविध कार्यक्रम राबवून संवाद व समजूत वाढवण्यासाठी नातवंडं, मुलं आणि ज्येष्ठ नागरिकांना एकत्र करून सामूहिक सहभागातून सामाजिक एकोप्याची भावना वाढेल.

# ज्येष्ठ नागरिक स्नेहमिलन

सहजीवन प्रकल्पांतर्गत यात्री निवास सेवाग्राम येथे आंधारवड आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी स्नेहमिलनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. या कार्यक्रमामध्ये कार्यक्रमाची सुरुवात स्वागत व परिचय सत्राने झाली. यानंतर विविध खेळ, गप्पा आणि मनोरंजक उपक्रम घेण्यात आले, ज्यामुळे उपस्थितांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.



या स्नेहमिलन कार्यक्रमात आधारवड संस्थेचे सदस्य आणि प्रकल्पातील गावपातळीवरील सहजीवन सारथीं सहभागी झाले. कार्यक्रमाचे वातावरण अत्यंत आनंददायी आणि उत्साही होते. उपस्थितांनी एकमेकांशी गप्पा मारल्या, अनुभव व्यक्त केले आणि जुनी आठवणी उजाळ्यात आणल्या. या स्नेहमिलनाचा मुख्य उद्देश सहभागींच्या परस्पर भेटीगाठीला प्रोत्साहन देणे होता. कार्यक्रमात मकर संक्रांतीच्या निमित्ताने पतंग बनवण्याचा उपक्रम पार पडला, ज्यात आधारवड सदस्यांनी आपले कौशल्य दाखवले. तसेच ज्येष्ठ नागरिकांनी पारंपरिक तिळ-गुळाचा स्वाद घेऊन कार्यक्रमाची गोडी द्विगुणित केली. सहभागींनी उत्साहाने पतंग बनवल्या, एकमेकांना शिकवले, गप्पा मारल्या आणि आनंदाचे क्षण एकत्र अनुभवले.

या कार्यक्रमामुळे समुदायातील नाती अधिक दृढ झाली, संवाद वाढला आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली. अशा स्नेहमिलनामुळे ज्येष्ठ नागरिकांमध्ये एकोप्याची भावना वाढली आणि त्यांचे जीवन अधिक आनंददायी झाले. या स्नेहमिलनामुळे विविध गटांना एकमेकांच्या कामाची ओळख झाली, प्रेरणा मिळाली आणि पुढील उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याची ऊर्जा मिळाली. ज्येष्ठ नागरिकांनीही अशा कार्यक्रमांचे आयोजन वारंवार व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली.





# प्रकल्पाच्या घडामोडी

## १. सहजीवन सारथी प्रशिक्षण

आपल्या आरोग्यासाठी – भाग २' या विषयावर सहजीवन सारथी आशा ताई यांचे एकदिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणात विविध गावांमधील सहजीवन सारथी उपस्थित होते."



## २. सहजीवन दूत प्रशिक्षण

मॉड्यूल-५ भाग २ आरोग्यावर आधारित आहे, ज्यात वृध्द नागरिकांसाठी गुडघे, पाठ, आणि कंबरदुखीबाबत सोपे व्यायाम तसेच नाक, कान, डोळे, तोंड आणि त्वचा संदर्भात स्वपरीक्षणाची माहिती दिली जाते. हे प्रशिक्षण 'सहजीवन दूत' यांच्यासोबत काही  महिन्याला घेतले जाते, जे इतर ज्येष्ठ नागरिकांसाठी मार्गदर्शक आणि संपर्क साखळी म्हणून कार्य करतात.








## ३. मासिक बैठक

सहजीवन प्रकल्पांतर्गत दर महिन्याला ज्येष्ठ नागरिकांची मासिक बैठक आयोजित केली जाते. या बैठकीत खेळी-मेळीच्या वातावरणात आरोग्यविषयक माहिती आणि सामाजिक बांधिलकीवर चर्चा केली जाते. मागील तीन महिन्यांत आशाताईंच्या माध्यमातून गावात विविध उपक्रम राबविण्यात आले. यात गुडघे दुखी, कंबर दुखी तसेच ज्ञानेंद्रिये  याविषयी जागरूकता, अनेक सहजीवन गटांची डब्बा पार्टी, तसेच जवळच्या ठिकाणांना आयोजित सहलींचा समावेश होता.

**मागील ३ महिन्यांचे विषय:**

- **जानेवारी**– पॅलिएटिव्ह केअर
- **फेब्रुवारी** – विविध खेळ
- **मार्च** –ज्येष्ठ नागरिकांचे मानसिक आरोग्य

## ४. गावस्तरावरील सामुदायिक कार्यकम



सहजीवन प्रकल्पाचा गावस्तरीय सामुदायिक कार्यक्रम सर्व वयोगटांसाठी आयोजित केला जातो, ज्याचा उद्देश जेष्ठ नागरिकांसह गावातील इतर लोकांपर्यंत प्रकल्प पोहोचवणे हा आहे. आष्टा या  गावात कृत्रिम मातीपासून विविध वस्तू तयार करण्याचा उपक्रम झाला. ज्येष्ठ नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेतला, मातीसह खेळताना त्यांना आपले बालपण आठवले आणि जुन्या आठवणींमध्ये रमले. त्याचप्रमाणे पवणार येथे विविध खेळ आयोजित करण्यात आले, ज्यात ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांनी मनापासून भाग घेतला. दोन्ही पिढ्यांनी एकत्र खेळणे आणि कला सादर करणे म्हणजे जणू दोन पिढ्यांमधला आनंददायी पूल तयार झाला.या कार्यक्रमातून सहजीवन प्रकल्पाच्या माध्यमातून गावात एकत्रितपणा, आनंद आणि आपुलकीची भावना दृढ होत असल्याचे दिसून आले.




## ज्येष्ठांची सहल

सहजीवन प्रकल्पाच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी सहल आयोजित करण्यात आली. या सहलीत एकूण १६ गावांतील ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून कार्यक्रमाला विशेष रंगत आणली. या सहलीचे वैशिष्ट्य म्हणजे तिचे नियोजन स्वतः ज्येष्ठ नागरिकांनीच केले होते. त्यांच्या इच्छेनुसार महाकाली मंदिर, मारुती मंदिर सेवा, बृहस्पती मंदिर, चौकी तसेच कृष्णगिरी मंदिर अशा पवित्र आणि रमणीय स्थळांना भेट देण्यात आली.या सहलीमुळे ज्येष्ठ नागरिकांना एकमेकांच्या सहवासात आनंदाचे क्षण अनुभवता आले, आठवणींना उजाळा मिळाला आणि सामाजिक बंध अधिक दृढ झाले. अशा उपक्रमांमुळे त्यांच्या जीवनात नवचैतन्य निर्माण होऊन आनंदाची नवी ऊर्जा मिळाली.

## तालुकास्तरीय  चित्रकला आणि निबंध स्पर्धा

सहजीवन प्रकल्प आणि जिल्हा शिक्षणाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धा तालुक्यातील इयत्ता ६ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी “मी आणि माझे आजी-आजोबा” या विषयावर तालुकास्तरीय चित्रकला व निबंध स्पर्धेचे उत्साहात आयोजन करण्यात आले.या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये ज्येष्ठ नागरिकांप्रती आदरभाव, आपुलकी आणि भावनिक नाते अधिक दृढ करणे हा होता. स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना आपल्या आजी-आजोबांसोबत वेळ घालवण्याची, त्यांच्या अनुभवांमधून शिकण्याची आणि पिढ्यांमधील संवाद अधिक समृद्ध करण्याची सुंदर संधी मिळाली.या उपक्रमातून केवळ सर्जनशीलतेला वाव मिळाला नाही, तर समाजात ज्येष्ठ नागरिकांविषयी संवेदनशीलता आणि कृतज्ञतेची भावना रुजवण्यासही मोठी मदत झाली.



## सहजीवन मेळावा

जनसेवा फाउंडेशन, पुणे आणि आधारवड ज्येष्ठ नागरिक संस्था, वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने वायगाव निपाणी (ता. वर्धा) आणि रोठा येथे ELITE प्रकल्पांतर्गत सहजीवन मेळावा आयोजित करण्यात आला. लिंबू-चमचा, संगीत खुर्ची, आणि बुद्धीचे खेळ तसेच भजन म्हटल्या गेले. आजी-आजोबा आणि नातवंडांना एकत्र वेळ घालवण्याची संधी मिळाली. हा मेळावा केवळ मनोरंजनासाठी नसून दोन पिढ्यांना जोडणारा आणि संवाद वाढवणारा प्रभावी उपक्रम ठरला.





## वयोमानावर आधारित भेदभाव (Ageism)

सहजीवन उपक्रमांतर्गत कुंभलकर समाजकार्य महाविद्यालय, वर्धा येथील समाजकार्य शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वयोमानावर आधारित भेदभाव (Ageism) या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये ज्येष्ठ नागरिकांप्रती आदर, समज आणि संवेदनशीलता निर्माण करणे हा होता. कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांना ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या, त्यांच्या भावना आणि समाजात त्यांच्याशी होणाऱ्या भेदभावाबद्दल माहिती देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांनी या विषयावर संशोधन करावे आणि समाजात व कुटुंबात ज्येष्ठ नागरिकांप्रती सकारात्मक दृष्टिकोन वाढवावा, असा संदेश देण्यात आला. कार्यशाळेत विविध क्रियाकलाप आणि चर्चा घेण्यात आल्या. या सर्व उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.

## समाजकार्य प्राध्यापकीय कार्यशाळा

दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी यात्री निवास सेवाग्राम येथे वर्धा जिल्ह्यातील संपूर्ण समाजकार्य महाविद्यालयातील प्राचार्य यांचेसाठी "एजिझम" या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेचा उद्देश प्राचार्य विद्यार्थी घडवीत असतांना वयोमानावर आधारित भेदभाव (Ageism) कमी करणे तसेच ज्येष्ठांप्रती आदर, समजूतदारपणा आणि संवेदनशीलता विकसित करणे हा होता. एकूण २२ प्राचार्यांनी या कार्यशाळेत सहभागी घेऊन गटचर्चा आणि अनुभवांच्या माध्यमातून समावेशक आणि सकारात्मक दृष्टिकोन आत्मसात केला.या उपक्रमामुळे प्राचार्यांमध्ये ज्येष्ठांचा सन्मान, सामाजिक मूल्यांची जाणीव आणि संवेदनशीलता अधिक दृढ झाली. या कार्यशाळेचे आयोजन महात्मा गांधी आयुर्विज्ञान संस्था सेवाग्राम अंतर्गत सहजीवन प्रकल्पामार्फत केले होते.



# परंपरेची चव जपणारे आचारी आजोबा – मारोतराव बावणे



तळेगाव टालाटूले हे वर्धा शहरापासून सुमारे २२ किमी अंतरावर वसलेले गाव आहे . या गावातील मारोतराव किसनाजी बावणे हे एक ज्येष्ठ, कष्टाळू आणि आदरणीय व्यक्तिमत्त्व आहेत. आज ७९ वर्षांचे असूनही त्यांची कामाची ऊर्जा आणि जिद्द अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी आहे.

मारोतराव बावणे यांचा परिवार मोठा असून त्यांनी आयुष्यभर कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. लहानपणापासूनच त्यांना स्वयंपाकाची आवड होती. चविष्ट पदार्थ बनवण्याची कला आणि लोकांना समाधान देण्याची इच्छा यामुळे त्यांनी आचारी काम निवडले. मागील ४० वर्षांपासून ते या क्षेत्रात कार्यरत असून त्यांच्या मेहनतीमुळे आणि प्रामाणिकपणामुळे त्यांनी गावात "प्रसिद्ध आचारी" म्हणून ओळख निर्माण केली आहे. ग्रामपंचायतीसमोर असलेल्या त्यांच्या छोट्याशा नाश्ता केंद्रात ते दररोज ताजे आणि खमंग पदार्थ तयार करतात. मात्र चवेसोबतच ते आरोग्याचाही विशेष विचार करतात. स्वच्छता, दर्जेदार साहित्य आणि ताज्या घटकांचा वापर याला ते प्राधान्य देतात. तेलाचा योग्य प्रमाणात वापर, ताज्या भाज्या आणि स्वच्छ पाण्याचा वापर यामुळे त्यांच्या पदार्थांची चव तर उत्तम असतेच, पण ते आरोग्यासाठीही सुरक्षित ठरतात. गावातील लग्नसमारंभ, जत्रा किंवा इतर कार्यक्रमांमध्ये आचारी म्हणून त्यांनाच विशेष बोलावले जाते. बदलत्या काळानुसार त्यांनी "कॅटरिंग सेवा" सुरू केली. विशेष म्हणजे व्यवसाय सांभाळत त्यांनी स्व:ताच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केले नाही. त्यांना या वयात सुद्धा आरोग्य संदर्भात कुठलाही त्रास नाही



> **"आप्पाजीचे भजे खाल्ल्याशिवाय दिवस निघत नाही आमचा"**
>
> **२१ वर्षीय युवक**

७९ व्या वर्षीही त्यांची मेहनत, सकारात्मक दृष्टिकोन आणि कामावरील निष्ठा प्रेरणादायी आहे. त्यांची कहाणी सांगते की प्रामाणिकपणा आणि कष्ट यांच्या जोरावर कोणताही व्यवसाय मोठा बनवता येतो. मारोतराव बावणे हे खऱ्या अर्थाने परंपरा, कष्ट आणि कलेचे जिवंत उदाहरण आहेत.



**लेखक: अश्विनी डंभारे**
**फील्ड समन्वयक**
**ELITE प्रकल्प**

# ज्येष्ठांची शिल्पकार

## सहजीवनाची नवी दिशा



सहजीवन प्रकल्प हा गावातील ज्येष्ठ नागरिकांसाठी केवळ एक उपक्रम नाही, तर आनंद, आपलेपणा आणि संवादाची नवी उर्जा निर्माण करणारा प्रेरणादायी प्रवास आहे. चितोडा गावातील आशा ताई खोंडे यांनी आपल्या निष्ठा, सातत्य आणि सेवाभावाने या प्रकल्पाला मजबूत पाया दिला आहे. गावातील अनेक ज्येष्ठ नागरिक एकाकीपणा, दुर्लक्ष किंवा संवादाच्या अभावामुळे मानसिकदृष्ट्या खचतात. अशा परिस्थितीत सहजीवन प्रकल्प त्यांना एकत्र आणतो, अनुभव व्यक्त करण्याची संधी देतो आणि नवचैतन्य मिळवून देतो.

आशा ताईंनी मासिक बैठकींचे आयोजन करून आरोग्य मार्गदर्शन, मनोरंजनात्मक कार्यक्रम, खेळ, भजन, गाणी आणि अनुभवकथन यांसारख्या विविध उपक्रम राबवले. त्या प्रत्येक ज्येष्ठ व्यक्तीला कुटुंबासारखे वागवतात, त्यांना मार्गदर्शन आणि मदत करतात. त्यांच्या कार्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना मानसिक आधार, आत्मविश्वास आणि सकारात्मक ऊर्जा मिळते. सहजीवन प्रकल्पामुळे त्यांच्या जीवनात आनंद वाढला, संवाद प्रगल्भ झाला आणि समाजाशी त्यांचा संबंध दृढ झाला. आशा ताईंनी केलेले कार्य केवळ चितोडा गावापुरते मर्यादित नाही तर इतरांसाठीही आदर्श ठरते. त्यांच्या समर्पण, निष्ठा आणि सेवाभावामुळे समाजातील ज्येष्ठ नागरिकांचे जीवन अधिक आनंदी, सन्माननीय आणि समाधानकारक झाले आहे.




> आम्ही दर महिन्याच्या बैठकीची आतुरतेने वाट पाहतो, कारण त्या क्षणांत आम्हाला एकत्र येण्याचा आनंद, मनमोकळा संवाद आणि आपलेपणाची ऊब अनुभवायला मिळते.
>
> -६५ वर्षीय आजी



**लेखक : बापू चव्हाण**
**फील्ड समन्वयक**
**ELITE प्रकल्प**

# म्हातारपणात आजोबाचा मित्र - नातू

म्हाताऱ्या आजी-आजोबाला दिली कोणी साथ
मित्र आजोबाचा नातू म्हातारपणात ....

जीवनाचा संघर्ष पुढे कसा येतो
सार काही कष्टामध्ये आयुष्य निघून जात
शेवटच्या क्षणी जुळते नातवांचा साथ
मित्र आजोबाचा नातू म्हातारपणात II १ II

वयोवृद्ध झाल कि म्हातारपण येते
थकल्या वयात मोठी फजिती होते
हाथ पाय थकले अश्या उतार वयात
मित्र आजोबाचा नातू म्हातारपणात II २ II

नातू आजी- आजोबांचा प्रेमळ होता
आजी-आजोबाला लई साथ देत होता
उपाशी नका राहू तुम्ही सांगा माज्या कानात
मित्र आजोबाचा नातू म्हातारपणात II ३ II

तुमच्या जीवनाची मला काळजी असावी
प्रकृती तुमची मला निरोगी दिसावी
बरे वाटत नसेल तर जाऊ दवाखान्यात
मित्र आजोबाचा नातू म्हातारपणात II ४ II

वयोवृद्ध घरामध्ये देवासमान असते
विचार करा स्वतःला तुम्ही कुठे असते
विश्वनाथ लिहितो सदा कविता कवनात
मित्र आजोबाचा नातू म्हातारपणात II ५ II



कवि :- विश्वनाथ बोंदाडे
मु. आदर्श नगर, सेवाग्राम
ता.जिल्हा – वर्धा

# पुढील वाटचाल

## एप्रिल २०२६

- मॉड्यूल ६ चे सहजीवन सारथी प्रशिक्षण
- गावपातळीवर जागतिक आंतरपिढी सप्ताह (GIW)
- प्रत्येक गावामध्ये नियमित मासिक बैठक.




## मे २०२६

- गावांमध्ये मॉड्यूल ६ चे सहजीवन दूत प्रशिक्षण.
- गावांमध्ये विशिष्ट उपक्रम.
- प्रत्येक गावामध्ये नियमित मासिक बैठक.



## जून २०२६

- मॉड्यूल ७ चे सहजीवन सारथी प्रशिक्षण
- गावांमध्ये विशिष्ट उपक्रम.
- प्रत्येक गावामध्ये नियमित मासिक बैठक.



## "हसत-खेळत, एकत्र पुढे जाऊया, सहजीवनाच्या वाटेवर, प्रत्येक क्षणांचा आनंद घेऊया".

### प्रकल्पाच्या अधिक माहिती साठी खाली दिलेल्या माध्यमांना भेट द्या...

ELITE Website

ELITE Facebook

ELITE Youtube

ELITE Instagram

ELITE LinkedIn

ELITE Twitter

माहिती संकलन व मांडणी:
**योगेश ढोक**
भाषा संपादन व शुद्धलेखन:
**इलाईट टीम**
डिझाईन व रचना:
**बापू चव्हाण**
**डॉ. राहुल पेठे**


**आमच्यासोबत जुळण्यासाठी**

संपर्क: ९७६४५०९४५३/७०३८३६८५१२

मुख्य कार्यालय: ELITE ऑफिस, गांधी मेमोरियल लेप्रसी फाऊंडेशन (GMLF), रामनगर, वर्धा. ४४२००१